# मी पाहिलेले देवदूत !

" आपण सर्वांनी देवाला प्रत्यक्ष पाहिलेले नाही. परंतु मी मात्र देवाने पाठविलेल्या देवदूताला प्रत्यक्ष भेटलेलो आहे "

माझे नांव मनोज भिमसिंग पावरा, मी सिकलसेल ॲनिमिया या दुर्धर अशा अनुवांशिक आजाराने ग्रस्त आहे. मला लहानपणापासूनच हात-पाय, कंबर-छाती व पोटामध्ये दुखत होते. मला माझ्या वडिलांनी सुरवातीला स्थानिक धडगांव या तालुक्याच्या गांवातील सरकारी दवाखान्यात, त्यानंतर शहादा व त्यानंतर तत्कालीन जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या धुळे या शहरात विविध दवाखान्यांमध्ये नेले. परंतु तेथे माझ्या आजाराचे योग्य निदान झाले नाही. त्यानंतर वडिलांनी मला मुंबई येथे नेले, मला सिकलसेल ॲनिमिया हा आजार झालेला आहे असे तिथे निदान झाले. तिथला औषधोपचार सुरु झाला पण ब-याच कालावधीनंतरही त्रास मात्र कमी झाला नाही. दरम्यानच्या कालावधीत माझ्या घरी पुणे येथील आदरणीय डॉ.सु.ल.काटे सर आले. मी तेव्हा लहानच होतो. त्यांनी माझ्या वडिलांना सिकलसेल ॲनिमिया या आजाराविषयी माहिती दिली. काही कालावधीनंतर डॉ.काटे सर यांनी मुंदलवड येथे जवाहर मेडिकल फॉऊंडेशनच्या दवाखान्यातील एका खोलीत शिबीराच्या रुपाने सिकलसेल ॲनिमिया चे रोगनिदान, औषधोपचार व समुपदेशन केंद्र सुरु केले. तेव्हापासून मला सिकलसेल विषयी त्यांच्याकडून माहिती मिळत गेली. मुंदलवड येथे निदान झालेल्या रुग्णांची संख्या जसजशी वाढायला लागली तसे डॉ.काटे सरांना याभागातील या आजाराची भीषणता लक्षात आली. त्यांनी शासन स्तरावर याविषयी बराच पाठपुरावा करुन शासनामार्फत या भागातील लोकांसाठी रोगनिदान व औषधोपचार मिळावा म्हणून प्रयत्न करुन पाहिला.

डॉ.काटे सरांनी या कालावधीत माझ्या वडिलांना याविषयी माहिती देवून त्यांनाही प्रयत्न करायला लावले. परंतु या विषयी शासनाची उदासिनता पाहून त्यांनी पुणे येथील महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव आदरणीय कै.डॉ.दादासाहेब सि.तु. गुजर सर यांना याची माहिती दिली. माझ्या वडिलांनाही त्यांनी कै.डॉ.दादासाहेब सि.तु.गुजर सरांशी याविषयी पत्रव्यवहार करायला लावला. पुढच्या काही कालावधीतच डॉ.काटे सरांनी कै.डॉ.दादासाहेब सि.तु.गुजर यांना या भागात आणून या आजाराची भीषणता लक्षात आणून दिली. कै.डॉ.दादासाहेब सि.तु.गुजर सर यांनी ही परिस्थिती पाहून शासनाची कोणतीही मदत न घेता स्वत:च्या संस्थेच्या खर्चाने डॉ.काटे सरांसोबत नियमितपणे दर दोन महिन्यांचे या आजाराचे रोगनिदान, त्याचा औषधोपचार व समुपदेशन शिबीर सुरु केले. हे शिबीर काही गावात, पाड्यात एखाद्या झाडाखाली किंवा हातपंपाशेजारी सुरु झाले. हे शिबीर वेगवेगळ्या ठिकाणी दोन-तीन दिवस सुरु राहायचे. कै.डॉ.दादासाहेब सि.तु.गुजर सर व डॉ.काटे सर हे शिबीर कालावधीत कुठंतरी झाडाखाली बसून रुग्ण तपासत होते. एखाद्या हातपंपाशेजारी कसेबसे कांदा-भाकरीचे जेवण उरकून शिबीर सुरु ठेवायचे व रात्र झाली की, शासकिय विश्रामगृहाचे रिझर्वेशन मिळाले तर विश्रामगृहात व रिझर्वेशन नाही मिळाले तर विश्रामगृहाच्या व्हरांड्यातच एखादी सतरंजी टाकून पडायचे; एखाद्यावेळी तर तिथंही जागा नाही मिळाली तर एखाद्या गांवात झाडाखाली राहायचे.

जसजशी या शिबीरात रुग्णांची संख्या वाढायला लागली तसतशी जागेची अडचण निर्माण होवू लागली. डॉ.काटे सरांनी कै.डॉ.दादासाहेब सि.तु.गुजर सरांच्या पूर्ण मदतीने महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित, सिकलसेल दवाखाना ची इमारत धडगांव येथे उभारली. त्याचा संपूर्ण खर्च महाराष्ट्र आरोग्य मंडळाने केला. याच दवाखान्यात आजपर्यंत शिबीर सुरु असून तिथं आता चार ते पांच हजार रुग्ण

औषधोपचार घेत आहेत. याचे पुर्ण श्रेय हे डॉ.काटे सरांचेच आहे. नाही तर आम्हा सिकलसेल ग्रस्त आदिवासींचा कोणीच वाली नसता. आम्हाला व शासनाला देखील सिकलसेल ॲनिमिया विषयी काहीच माहिती नसती. आदरणीय डॉक्टर सु.ल.काटे सरांनी आमच्या धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील प्रत्येक गांवात, पाड्यात जावून सिकलसेल रुग्णांचे रोगनिदान केलेले आहे. एखाद्या गांवात रुग्ण आढळला तर डॉ.काटे सर त्या रुग्णाच्या पूर्ण कुटुंबाच्या रक्त तपासणीसाठी त्या गांवात गेलेले आहेत. मग ते पूर्वेला तोरणमाळच्या खालच्या पट्ट्यातील गोरांबापासून ते पश्चिमेला थेट गुजरात राज्याच्या हदीपर्यंत, दक्षिणेला असली, अस्तंभा, चांदसैली पासून ते थेट नर्मदेला लागून असलेल्या मध्यप्रदेश राज्याच्या हदीपर्यंत सर जावून आलेले आहेत. या अतिदुर्गम भागातील गावांमध्ये फिरण्यासाठी काही ठिकाणी कोणतीही दळणवळणाची सोय नाही तिथं सर काही किलोमीटर पायी फिरलेले आहेत. सकाळी भाकरी बनवून घेवून गेलेलीच रात्री पण खायची किंवा रात्रीची शिल्लक असलेली भाकरी सकाळी खायची, असं करुन सरांनी या भागातील सिकलसेल ॲनिमिया या आजाराचे रुग्ण हूडकून काढलेले आहे.

मी जास्त आजारी पडलो की, माझे वडिल मला शहादा, धुळे येथे घेवून जायचे. तिथं मला ॲडमीट केलं जायचं, त्यासाठी बराच खर्च व्हायचा. आमच्या जिल्ह्यातील बरेचसे डॉक्टर हे डॉ.काटे सरांचे विद्यार्थी आहेत. त्यामुळे सर त्यांना चिठ्ठी लिहून किंवा फोन करुन बिलामध्ये सुट द्यायला सांगत. मला आजपर्यंत डॉ.काटे सरांमुळे प्रत्येक रुग्णालयात सुट मिळालेली आहे. मला चालण्यांस व हालचाल करण्यास जास्त त्रास होत होता त्यामुळे माझी दोन्ही खुब्याची कृत्रिम सांधेबदल शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यासाठी डॉ.काटे सर हे पुणे येथील त्यांचे विद्यार्थी संचेती रुग्णालयाचे डॉ.पराग संचेती यांच्याकडे मला घेवून गेले, त्यांनी एकुण खर्चापैकी तीन ते चार लाख सूट देण्याचे मान्य केले परंतु तेथील खर्च माझ्या आवाक्याबाहेरील होता. त्यामुळे डॉ.काटे सरांनी पुणे येथील कै.डॉ.धैर्यशील शिरोळे सरांच्या मदतीने अत्यंत कमी खर्चात रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण येथील वालावलकर रुग्णालयात सदर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या घडवून आणली. माझ्या या शस्त्रक्रियेसाठी कै.डॉ.धैर्यशील शिरोळे व डॉ.काटे सर हे डेरवण येथे पांच दिवस थांबून होते. माझा तिथला बराच खर्च सरांनी केलेला आहे. एवढेच नाही तर सरांना माझी आर्थिक परिस्थिती ज्ञात असल्यामुळे त्यांनी माझ्या एका मुलाचा शिक्षणाचा खर्च देखिल आपल्या पेंशन मधून केलेला आहे. तो माझा मुलगा केवळ सरांच्या मदतीनेच आज बी.ई.(सिव्हील) झालेला आहे. माझ्या सारख्याच इतर अनेक रुग्णांना डॉ.काटे सरांनी वेळोवेळी मदत केलेली आहे. मला केवळ आर्थिक मदतच नाही तर इतर कोणतीही मदत व मार्गदर्शन सरांकडून आजपर्यंत मिळत आलेले आहे. प्रत्येक शिबीराच्या वेळेस सर स्वत: व इतरांकडून वस्तू रुपाने मदत मिळवून सिकलसेल रुग्णांना देत असतात.

सरांची या वयात काम करावयाची धडाडी, आमच्यासाठी सुरु असलेले प्रयत्न पाहूनच आम्हा रुग्णांना पुढील जीवन जगण्याची दिशा प्राप्त झालेली आहे. आमच्या जीवघेण्या वेदनेमुळे आम्हाला कधी कधी जीवन संपवावे असे वाटायचे परंतु आम्हाला डॉ.काटे सरांकडून जीवन जगण्यासाठी शक्ती प्राप्त झालेली आहे. स्वत:साठी जगता जगता इतरांसाठीही जगावे हा मंत्र आम्हाला डॉ.काटे सरांकडून प्राप्त झालेला आहे. आमचे जीवन सुकर व्हावे, आम्हाला जीवन जगण्याची शक्ती मिळावी, आम्हाला सन्मानाने जगता यावे यासाठीच परमेश्वराने आदरणीय डॉ.सु.ल.काटे या देवदूताच्या रुपाने आमच्या साठी जन्म घेतलेला आहे.

" म्हणून मी देवाने पाठविलेल्या देवदूताला प्रत्यक्ष भेटलेलो आहे व हे माझे भाग्यच आहे. "